# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.07.2025** **वार:शनिवार**

---

1. मालदीव्जच्या 60व्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार
2. तमिळनाडूत तुतीकोरीन इथं पंतप्रधानांच्या हस्ते आज विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन
3. अश्लील, असभ्य आशय प्रसारित करणाऱ्या 25 ओटीटी संकेतस्थळे आणि ॲप्सवर बंदी घालण्याचे निर्देश
4. फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामन्यात दोन भारतीय आमनेसामने आणि
5. महाराष्ट्रात बहुतांश जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा, कोल्हापुरात राधानगरी धरणाचे चार दरवाजे उघडले

**पंतप्रधान मालदीव्ज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मालदीव्जच्या 60व्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान कालपासून मालदीव्जच्या दौऱ्यावर आहेत. मालदीव्जच्या नागरिकांना त्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मालदीव्जचे राष्ट्रपती मुईत्झु यांनी मोदी यांच्या सन्मानार्थ काल विशेष समारंभाचे आयोजन केलं होतं. उभय देशांदरम्यान विविध सामंजस्य करारही करण्यात आले. त्यामध्ये पत पुरवठा, कर्ज परतफेड, परदेशी गुंतवणूक, मत्स्यपालन आणि जलचर, डिजीटल परिवर्तन, औषध निर्माण तसंच युपीआयशी निगडीत आठ करारांचा समावेश आहे. त्याशिवाय पुण्यातल्या आयआयटीएम म्हणजेच भारतीय उष्णकटिबंधीय हवामान विज्ञान संस्थेबरोबर मालदीवच्या हवामान विभागाशी झालेल्या कराराचाही यात समावेश आहे. भारताने मालदीव्जला साधारण पाच हजार कोटी रुपयांचा पतपुरवठा केला आहे. या आर्थिक मदतीमुळे मालदीव्जला प्रमुख पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांना निधी पुरवठा होऊ शकणार आहे. पंतप्रधान मोदी आणि मालदीव्जचे राष्ट्रपती मुईत्झु यांनी माले इथल्या संरक्षण मंत्रालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन केले त्यानंतर दोन्ही नेत्यांनी एक पेड मां के नाम या उपक्रमाला बळकटी देत वृक्षारोपण केले.

**पंतप्रधान-तामिळनाडू**

मॉरिशस दौऱ्यानंतर आज संध्याकाळी थेट तामिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. तामिळनाडूच्या तुतीकोरीनमध्ये पंतप्रधानांच्या हस्ते साधारण पाच हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण होणार आहे. यामुळे प्रादेशिक संपर्कजाळे, दळणवळण कार्यक्षमता वृद्धी, स्वच्छ ऊर्जा संरचना मजबूत होईल. यामध्ये तुतीकोरीन विमानतळाची नवी इमारत, दोन रस्त्यांचे रूंदीकरण, मदुराई-बोदिनायक्कुरन रेल्वे मार्ग विद्युतीकरण, तसंच कुडनकुलम अणुउर्जा प्रकल्पासाठी वीज पारेषण प्रकल्प पायाभरणी यांचा समावेश आहे.

**कारगील दिवस**

आज देशभरात करगील विजय दिवस साजरा केला जात आहे. 1999 च्या करगिल युद्धात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या भारतीय सैनिकांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आज या दिवसाचा 26 वा वर्धापन दिन आहे.

**संसद**

संसदेच्या दोन्ही सभागृहात कालही विविध मुद्द्यांवरुन विरोधकांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी लोकसभेच्या कामकाजाच्या प्रारंभी करगील विजय दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त करगील युध्दातील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**सर्वपक्षीय बैठक**

दरम्यान, सभागृहाचं कामकाज सुरळीत चालावं म्हणून लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी काल सर्वपक्षीय बैठक घेतली. सोमवारपासून कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यावर या बैठकीत एकमत झालं. या बैठकीला भाजपा खासदारांसह काँग्रेस, समाजवादी पार्टी, संयुक्त जनता दल आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार उपस्थित होते.

**ऑपरेशन सिंदूर चर्चा**

संसदेत येत्या सोमवारी ऑपरेशन सिंदूरविषयी चर्चा होणार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांना काल माध्यमांशी बोलताना सांगितले. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय कामकाज समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले. संसदेच्या दोन्ही सभागृहात यांवर होणार असून त्यासाठी 16 तास देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**पंतप्रधान कार्यकाळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सलग सर्वाधिक काळासाठी पंतप्रधानपदी राहिलेले दुसरे पंतप्रधान ठरले आहेत. त्यांनी पंतप्रधानपदाचे 4 हजार 78 दिवस काल पूर्ण केले. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा या संदर्भातला विक्रम त्यांनी मोडला आहे. भाजपा प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी काल माध्यमांना ही माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांचा कार्यकाळ विकासाचे सुवर्णयुग ठरला, असं मत त्यांनी नोंदवलं. माजी पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी सर्वाधिक म्हणजे सलग 17 वर्ष पंतप्रधान म्हणून काम केलं आहे.

**अमित शहा-सुरक्षा रणनीती**

दहशतवादी आणि तस्करी कारवायांमधील फरार आरोपींना परत आणण्यासाठी देशातील कायदा अंमलबजावणी संस्थांनी समर्पित उपाययोजना कराव्यात असे निर्देश काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले आहेत. दिल्लीत सुरू असलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषद 2025 चे उद्घाटन शहा यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. दहशतवादी-गुन्हेगारी संबंधांतील देशांतर्गत घटक नेस्तनाबूत करण्याच्या दृष्टीकोनाचे पुनर्मूल्यांकन करण्याबरोबरच, केंद्रीय आणि राज्य कायदा अंमलबजावणी यंत्रणांनी परस्पर समन्वय वाढवण्याच्या गरजेवरही मंत्र्यांनी भर दिला. आर्थिक अनियमिततेशी संबंधित माहितीचे विश्लेषण करून दहशतवादी प्रारुप शोधण्याचे निर्देश दिले. तसंच दहशतवाद्यांकडून एन्क्रिप्टेड संवादाच्या वापर रोखण्यासाठी भागधारकांसह एक मंच स्थापन करण्याचे निर्देश गृहमंत्रालयाला दिले आहे.

**ओटीटीबॅन**

अश्लील, असभ्य आशय प्रसारित करणाऱ्या 25 ओटीटी संकेतस्थळे आणि ॲप्सवर बंदी घालण्याचे निर्देश केंद्र सरकारने काल दिले आहे. या मंचांवरील काही आशयामध्ये अनुचित पद्धतीने अश्लील आणि असभ्य दृश्य आशय दाखवण्यात येत असल्याचे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने नमूद केले आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ, महिला आणि बाल विकास मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, कायदेशीर व्यवहार विभाग आदींशी चर्चा करून ही कारवाई करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले आहेत.

**अटलपेन्शन**

केंद्र सरकारच्या अटल पेन्शन योजनेने चालू आर्थिक वर्षात 8 कोटी नोंदणीचा महत्त्वाचा टप्पा ओलांडत, मैलाचा दगड पार केला आहे. यामध्ये 39 लाख नवीन सदस्यांची भर पडली आहे. सामाजिक सुरक्षा योजना म्हणून 2015 मध्ये ही योजना सुरू झाली असून याच वर्षी त्याची दशकपूर्ती झाली आहे. गरीब, वंचित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना लक्ष्य करणारी ही देशातली महत्त्वाची योजना आहे.

**युपीएससी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाने एका उमेदवारावर, परीक्षेदरम्यान अनुचित साहित्याचा वापर केल्याप्रकरणी सर्व परीक्षा आणि निवड चाचण्या देण्यास तीन वर्षांसाठी बंदी घाली आहे. आयोगाच्या परीक्षा प्रक्रियेत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि निष्पक्षता राखण्यासाठी वचनबद्ध असल्याचे युपीएससी अध्यक्ष डॉ. अजयकुमार यांनी स्पष्ट केले. त्यामुळेच अशा दोषी उमेदवारांवार नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असल्याचं ते म्हणाले.

**इंग्लंड डॉक्टर संप**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या डॉक्टरांच्या संपामुळे राष्ट्रीय पातळीवरील आरोग्य सेवेवर परिणाम झाल्याचे वृत्त आहे. निवासी डॉक्टरांनी पाच दिवस संप पुकारला असून, त्याचा आरोग्य सेवेवर कमीत कमी परिणाम व्हावा यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे आरोग्य सचिव वेस स्ट्रीय यांनी म्हटलं आहे. सरकार आणि ब्रिटिश मेडिकल असोसिएशनमध्ये वेतनाबाबत करार न झाल्यामुळे हजारो निवासी डॉक्टर्स कालपासून संपावर गेले आहेत.

**बॅडमिन्टन**

भारताच्या बॅडमिन्टनपटू सात्विकसाईराज रान्कीरेड्डी आणिचिराग शेट्टी यांनी चीनमधल्या चांगझाऊ इथं सुरु असलेल्या चीन खुल्या बॅडमिन्टन स्पर्धांच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. त्यांनी मलेशियाच्या जोडीचा पराभव केला असून आता त्यांचीगाठ मलेशियाच्याच आरॉन चिया आणि सो वूई यिक यांच्याशी पडणार आहे.

**बुद्धिबळ**

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना आज दिव्या देशमुख आणि कोनेरू हंपी यांच्यात होणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत भारताचं विजेतेपद आणि उपविजेतेपदही निश्चित आहे.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत मँचेस्टर इथं सुरू असलेल्या चौथ्या सामन्यात इंग्लंडनं पहिल्या डावात 186 धावांची आघाडी घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा यजमान संघाच्या 7 बाद
244 धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी भारतानं पहिल्या डावात 358 धावा केल्या होत्या. या मालिकेत इंग्लंड 2-1 ने आघाडीवर आहे.

**हवामान इशारा**

महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोल्हापूरमध्ये राधानगरी धरणाचे चार दरवाजे उघडले असून साधारण साडेपाच हजार क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील 22 बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तसंच, मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत उद्यापर्यंत समुद्र खवळलेला असेल आणि उंच लाटा उसळतील असा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांनी समुद्रात जाऊ नये अशी सूचना प्रशासनानं केली आहे. स्थानिक प्रशासनालाही सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.